प्रमाण राग गायनात अन्य स्वरांच्या तुलनेत अधिक असते.

७) **संवादी स्वर :** रागामध्ये वादी स्वराच्या खालोखाल महत्त्व असणारा दुसरा स्वर म्हणजे 'संवादी स्वर' होय.

८) **अनुवादी स्वर :** रागामध्ये वादी व संवादी हे महत्त्वाचे स्वर सोडून जे इतर स्वर असतात त्यांना 'अनुवादी किंवा सहचारी स्वर' असे म्हणतात.

उदा. भूप रागात 'सा रे ग प ध' या स्वरांपैकी 'ग' व 'ध' हे दोन स्वर क्रमशः 'वादी', 'संवादी' असून 'सा रे प' हे अनुवादी स्वर आहेत.

९) **वर्ज्य स्वर :** रागाचे गायन करताना जे स्वर घेतले जात नाहीत, त्यास 'वर्ज्य' किंवा 'वर्जित स्वर' असे म्हणतात. उदा. भूप रागामध्ये 'म' व 'नि' हे दोन स्वर घेतले जात नाहीत. म्हणून ते भूप रागातील वर्ज्य स्वर होत.

१०) **सप्तक :** षड्ज ते निषाद पर्यंतच्या सात स्वरांना व त्यात षड्ज मिळविला की 'सप्तक' पूर्ण होते. सप्तकाचे तीन प्रकार पडतात.

१) मंद्र सप्तक :

२) मध्य सप्तक :

३) तार सप्तक :

[illegible]) **जाती :** रागांमध्ये उपयोगात आणलेल्या स्वरसंख्येवरून रागाची जाती निश्चित होते. त्याचे तीन प्रकार पडतात.

१) **औडव :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता पाच स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'औडव' जातीयुक्त राग असे म्हणतात.

२) **षाडव :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता सहा स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'षाडव' जातीयुक्त राग असे म्हणतात.

३) **संपूर्ण :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता सातही स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'संपूर्ण' जातीयुक्त राग असे म्हणतात.

रागातील आरोह आणि अवरोहातील स्वरसंख्येवरून रागाची जाती निश्चित केली जाते. मुख्य जाती तीन. १) औडव, २) षाडव, ३) संपूर्ण व आरोह-अवरोहातील



स्वरसंख्ये आधारे उपजाती खालीलप्रमाणे.

१) **औडव-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

२) **औडव-षाडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

३) **औडव-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

४) **षाडव-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

५) **षाडव-षाडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

६) **षाडव-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

७) **संपूर्ण-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

८) **संपूर्ण-षाडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

९) **संपूर्ण-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

११) **गानसमय :** राग नियमांचा विचार करून संगीतज्ञांनी राग गायनाची निश्चित केलेली वेळ म्हणजे 'गानसमय' होय.

१२) **पकड :** रागाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी रागातील विशिष्ट स्वर समूह रागगायनात वारंवार घेतला जातो. त्यास रागाचे 'मुख्यांग' किंवा रागाची 'पकड' असे म्हणतात.